# संपादकीय,

सस्नेह नमस्कार...

जून २०२२ चा ‘नवज्योत’चा अकराव्या वर्षातील दुसरा अंक प्रसिद्ध करत असताना अतिशय आनंद होत आहे. नवज्योत ही आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिका खऱ्या अर्थाने आंतरविद्याशाखीय बनत चालली आहे संशोधन पत्रिकेस आवश्यक सर्वमानांकने मिळवण्याचा प्रयत्न सातत्याने संपादकीय मंडळ करत आहे. रिव्ह्यू कमिटीकडून संशोधन पेपर तपासणी कार्यात सहकार्यामुळे अंक वेळेत प्रकाशित करणे शक्य आहे. सर्वच विद्याशाखेतील संशोधन पेपरर्सना या अंकात स्थान दिलेले आहे. विज्ञान, समाजविज्ञान, कला व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील पेपर यांना अंकात स्थान मिळालेले आहे.

राजे रामराव महाविद्यालय, जत जि. सांगली येथे संपन्न झालेल्या ‘भारतीय लोकशाही वाटचाल आणि भवितव्य’ या विषयावरील निवडक संशोधन पेपरना या अंकात स्थान देताना आम्हास आनंद होतो आहे. भारतीय लोकशाहीची विविध क्षेत्रातील वाटचाल, आव्हाने आणि भवितव्य या अंगाने संशोधन पेपरची मांडणी केलेली आहे. तसेच राज्यशास्त्र विषयाखेरीज मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, शारीरिक शिक्षण अशा विविध संशोधन पेपरची मांडणी शास्त्रीय कसोट्या आधारे झालेली आहे. तरी सदर अंक सर्व वाचक हितचिंतक संशोधकांना सविनय सादर...
धन्यवाद

प्रा. डॉ  शिवाजी पाटील

छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा